नियमित दिवाणी दावा क्र.८७९/२०२२

दत्ता व ईतर ०२ वि. बाबू व ईतर ०१

CNR. MHLA140021402022

## निशाणी क्र. ३० वर आदेश.

प्रस्तुतचा अर्ज हा वादी क्र.२ नागिनबाई हरी खुर्दे उर्फ नागिनबाई बाबू भुसनूर हिच्या वतीने देण्यात आला आहे. वादीने कथन केले की, वादी क्र.१ दत्ता बाबू भुसनूर हा वादी क्र.२ चा सख्खा भाऊ असून प्रस्तुत दावा चालू असताना त्याच्यावर पोलीस स्टेशन किल्लारी, ता. औसा येथील गुन्हा नोंद झालेला आहे. आजमितीस यातील वादी दत्ता बाबू भुसनूर हा कारागृहात न्यायाधीन बंदी आहे. प्रस्तुत दाव्यातील कायदेशीर कार्यवाहीकरीता सदर वादीचे वतीने न्यायालयात अधिकारपत्र दाखल करणे गरजेचे आहे. म्हणून, प्रस्तुत वादी नागिनबाई हिने सदरचा अर्ज हा वादी दत्ता भुसनुर याची स्वाक्षरी घेणेकरीता परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. सदर अर्जावर प्रतिवादी यांचे म्हणणे मागविले. परंतु, वारंवार पुकारल असता प्रतिवादींतर्फे कोणीही हजर झाले नाही. सबब, सदरचा अर्ज प्रतिवादी यांचे म्हणणेविना चालविण्यात येत आहे.

३. वादीतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीचा अभिलेखावरील अर्ज व युक्तिवाद यांचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादी क्र.१ दत्ता बाबू भुसनूर हा वादी क्र.२ चा सख्खा भाऊ असून प्रस्तुत दावा चालू असताना त्याच्यावर पोलीस स्टेशन किल्लारी, ता. औसा येथील गुन्हा नोंद झालेला आहे. आजमितीस यातील वादी दत्ता बाबू भुसनूर हा कारागृहात न्यायाधीन बंदी आहे. प्रस्तुत दाव्यातील कायदेशीर कार्यवाहीकरीता सदर वादीचे वतीने न्यायालयात अधिकारपत्र दाखल करणे गरजेचे आहे. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने नैसर्गिक न्यायतत्वाच्या आधारे वादी यांना त्यांची बाजु मांडण्याची संधी मिळणे न्यायोचित आहे. त्यायोगे, वादीस सदर अनुषंगीक परवानगी देणे गरजेचे वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश :

**आदेश**

१. प्रस्तूत अर्ज निशाणी ३० मंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

Digitally signed by PARAG PHADNIS AWATE
Date: 2025.11.07 16:31:08 +0530

औसा.

दिनांकः– ०७/११/२०२५. सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, औसा